आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२ सप्टेंबर २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सार्वजनिक आरोग्य विभागाच्या ३ सेवांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

- मुंबई, पुणे आणि नागपूर विद्यापीठात कुलपती पदक सुरू करण्याची राज्यपालांची घोषणा

- SIR अंतर्गत हरकती आणि दाव्यांची नोटीस दूरध्वनी तसंच व्हॉट्सॲपद्वारे पाठवण्याचे निवडणूक आयोगाचे आदेश

आणि

- दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सोपवण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश

**<><><><><>**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड, एकात्मिक आरोग्य सुविधा केंद्र आणि रुग्णालयांच्या स्टार रेटिंग प्रणाली या तीन महत्वपूर्ण उपक्रमांचा प्रारंभ मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत करण्यात आला. राज्यातल्या आरोग्यविषयक माहितीचं केवळ संकलन न करता तिचा लोकहितासाठी व्हावा. या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्यसेवा देण्यासाठी विभागानं काम करावं, असं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध कार्यक्रमांसाठी सध्या ४० हून अधिक स्वतंत्र पोर्टल कार्यरत आहेत. या पोर्टलवरची महत्त्वाची माहिती एकत्रित करून एकाच व्यासपीठावर उपलब्ध करण्यासाठी एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड विकसित केला आहे. एकात्मिक आरोग्य सुविधा केंद्राच्या माध्यमातून ‘१०४’ कॉल सेंटरचे सुसूत्रीकरण केलं आहे. नागरिकांकडून येणारे फोन कॉल्स तसंच आरोग्य विभागाकडून केल्या जाणाऱ्या संपर्क कॉल्सचंही नियोजन या केंद्रातून होणार आहे. राज्यातल्या शासकीय रुग्णालयांमध्ये उपलब्ध सेवांचं प्रमाणीकरण आणि गुणवत्तावाढ करण्यासाठी स्टार रेटिंग प्रणाली सुरू केली आहे. या प्रणालीमुळे नागरिकांना रुग्णालयांमध्ये उपलब्ध सेवांची सर्वसमावेशक माहिती घरबसल्या मिळेल.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी विनावाहक बससेवेला प्राधान्य देण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. ते एसटी महामंडळाच्या मुख्यालयात उत्पन्न वाढीच्या अनुषंगाने बोलावलेल्या आढावा बैठकीमध्ये बोलत होते. एसटीच्या उत्पन्न वाढीसाठी पारंपरिक कार्यपद्धतीच्या चौकटीबाहेर जाऊन नाविन्यपूर्ण प्रयोग राबवावेत, असे निर्देश सरनाईक यांनी यावेळी दिले.

<><><><><>

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आता ‘कुलपती पदक’ प्रदान करण्यात येणार आहे. राज्यपाल तथा राज्य विद्यापीठांचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांच्या पुढाकारानं सुरू करण्यात येत असलेल्या या उपक्रमासाठी राज्यपालांच्या हस्ते तिन्ही विद्यापीठांच्या कुलगुरूंना प्रत्येकी १० लाख रुपयांचा प्रातिनिधिक धनादेश आज मुंबईत लोकभवन इथे प्रदान करण्यात आला.

‘कुलपती पदक’ हे केवळ शैक्षणिक गुणवत्तेपुरतं मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाची, नेतृत्वगुणांची, नवोन्मेषाची, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातल्या कामगिरीची, सामाजिक बांधिलकीची आणि विद्यापीठासाठीच्या विशेष योगदानाची दखल घेणारं असावं , अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली .

<><><><><>

राज्यातल्या शाळांची परिस्थिती सुधारण्यासाठी राज्य सरकार ‘चला शाळेत जाऊया’ हे अभियान सुरू करणार आहे. यात वरिष्ठ अधिकाऱ्यांना जिल्हा दत्तक देऊन त्यांना तिथल्या शाळांची पाहणी करण्याची जबाबदारी दिली आहे, असं शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत सांगितलं.

<><><><><>

बीड ते पुणे रेल्वेसाठी आवश्यक असलेल्या तंत्रज्ञान आणि सुरक्षाविषयक चाचण्या पुर्ण झाल्या असून येत्या १७ सप्टेंबरला ही गाडी धावणार आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज मुंबईत घेतलेल्या बैठकीत हे आदेश दिले. बीडपासून मुंबईपर्यंतच्या रेल्वेमार्गाच्या आवश्यक त्या चाचण्या लवकरात लवकर करण्याच्या सूचना सुनेत्रा पवार यांनी यावेळी केल्या.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२ सप्टेंबर २०२६ - बुधवार

<><><><><>

राज्यातल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षणातून एकही पात्र मतदार वगळला जाणार नसल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी स्पष्ट केलं आहे. हरकती- सूचनांच्या सुनावणीसाठी संबंधितांना नोटीस बजावण्यासोबतच दूरध्वनीद्वारे संपर्क साधून सुनावणीला उपस्थित राहण्याचं आवाहन करावं. संबंधित व्यक्तीकडून प्रतिसाद मिळाला नाही, तर आदेशाची प्रत त्यांच्या व्हॉट्स्ॲप क्रमांकावर पाठवावी. संबंधित व्यक्तीला सुनावणीला उपस्थित राहण्यात अडचण असल्यास त्यांच्या नातेवाईकांना सुनावणीला उपस्थित राहून नागरिकत्वाचा पुरावा सादर करण्याची मुभा द्यावी, असे निर्देश चोक्कलिंगम यांनी दिले आहेत. नागरिकांना बदललेल्या मतदान केंद्राबाबत माहिती मिळावी, यासाठी सुनावणीची शिबिरं शक्यतो नवीन मतदान केंद्रांवर घ्यावीत. यामुळे नागरिकांना नवीन मतदान केंद्र शोधताना होणारा संभ्रम टाळता येईल. दुसऱ्या टप्प्यात केवळ नागरिकत्व आणि इतर कागदपत्रांची पडताळणी करावी. नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या कागदपत्रांच्या यादीतील नागरिकांकडे उपलब्ध असलेले कागदपत्र स्वीकारावं, असे निर्देशही त्यांनी दिले आहेत.

<><><><><>

राज्यात SIR मोहिमेअंतर्गत प्रारूप मतदार यादीत मोठ्या संख्येनं मतदारांची नावं वगळली गेली आहेत, त्यावर दावे-हरकती दाखल करण्यासाठी पुरेसा कालावधी द्यावा, अशी मागणी प्रदेश काँग्रेसनं केली आहे. ही मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत वाढवावी, अशी मागणी प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस ॲड. संदेश कोंडविलकर यांनी केली आहे.

<><><><><>

दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची मॅनेजर दिशा सालियन हिच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश आज मुंबई उच्च न्यायालयानं सीबीआयला दिले. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह राजे भोसले यांच्या खंडपीठासमोर आज या प्रकरणाची सुनावणी झाली. त्यावेळी दिशा हिचे वडील सतीश सालियन यांचा जबाब नोंदवण्यासाठी आणि तक्रार दाखल करण्यासाठी एका वरिष्ठ आणि अनुभवी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे आदेश न्यायालयानं सीबीआयला दिले. मात्र,

तपासादरम्यान, सबळ पुराव्यांशिवाय कोणालाही आरोपी मानलं जाणार नाही, असंही न्यायालयाने स्पष्ट केलं.

दिशा सालियन हिचा ८ जून २०२० रोजी मुंबई उपनगरातल्या एका निवासी इमारतीच्या १४व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला होता. या प्रकरणी मुंबई पोलिसांनी अपघाती मृत्युची नोंद केल्याचा तसंच आपली दिशाभूल करत आत्महत्येचा निष्कर्ष स्वीकारण्यासाठी दबाव आणल्याचा आरोप तिचे वडील सतीश सालियन यांनी केला होता.

<><><><><>

अवैध जात प्रमाणपत्र सादर केल्यामुळे नगरसेविका पद रद्द करण्याच्या महापालिका आयुक्तांच्या आदेशांना आव्हान देणारी माजी महापौर विशाखा राऊत यांची याचिका आज मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळली. ज्या अधिकाऱ्यानं राऊत यांना जात प्रमाणपत्र जारी केलं होतं, त्याला तसे अधिकार नसल्याचं सांगत पालिका आयुक्तांनी राऊत यांचं पद रद्द करून सहा वर्षांच्या निवडणूक अपात्रतेची अधिसूचना जारी केली होती.

<><><><><>

काँग्रेस संघटनेचा विस्तार करण्याचं आणि काँग्रेसच्या विचारांशी ठाम बांधिलकी ठेवून, जनतेला न्याय मिळावा यासाठी संघर्ष करण्याचं आवाहन, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केलं आहे. ते आज नाशिक इथं, काँग्रेस जिल्हाध्यक्षांच्या १० दिवसांच्या निवासी प्रशिक्षण शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलत होते. काँग्रेसचे अनेक ज्येष्ठ नेते यावेळी उपस्थित होते. काँग्रेसच्या ‘संघटन सृजन अभियानाअंतर्गत जिल्हा काँग्रेस समिती अध्यक्षांच्या निवड प्रक्रियेचा भाग म्हणून हे प्रशिक्षण शिबिर आयोजित केलं होतं. राहुल गांधी यांनी आज जिल्हाध्यक्षांना जिजित्सू मार्शल आर्ट्सची माहिती प्रात्याक्षिकासह दिली. त्यानंतर त्यांनी नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर इथल्या आंदोलनकर्त्या आदिवासी विद्यार्थ्यांशी संवाद साधून, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या, आणि काँग्रेस पक्ष त्यांच्या या लढ्यात सोबत असल्याची ग्वाही दिली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस आणि २५ वर्षांच्या सेवा कालावधीनिमित्त शिवसेना २५ राज्यात रुग्णवाहिका देणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. नवी दिल्ली इथे विविध राज्यांच्या शिवसेना राज्यप्रमुखांच्या आढावा बैठकीत ते

बोलत होते. शिवसैनिकांनी शिक्षण, रोजगार अशा अनेक मुलभूत मुद्द्यांवर प्रभावीपणे काम करावे असं आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

वाढत्या महागाईच्या मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीनं आज मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरात आंदोलन करण्यात आलं.या आंदोलनात पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा खासदार सुप्रिया सुळे तसंच मुंबईतीतले पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यातल्या वसई तालुक्यामधल्या मौजे मोरी इथं अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांविरोधात महसूल प्रशासनानं कारवाई करत ५७४ अनधिकृत बांधकामं जमीनदोस्त केली.

**<><><><><>**

यंदाच्या गणेशोत्सवात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने श्रीगणेशा आरोग्याचा हा उपक्रम राबवण्यात येईल, अशी घोषणा महापौर रितु तावडे यांनी काल केली.

**//<><><><><>//**